**प्रेस नोट** दिनांक १५/०२/२०२३

## सांगवी वाहतूक विभाग, पिंपरी चिंचवड
## विशेष मोहिम अंतर्गत करण्यात आलेल्या कारवाईबाबत

मा.श्री.विनयकुमार चौबे, पोलीस आयुक्त सो, पिंपरी चिंचवड यांनी विशेष मोहिम अंतर्गत बीआरटी मार्गामधून जाणा-या खाजगी वाहनांवर जास्तीत जास्त कारवाई करण्याचे आदेश दिले होते. सदर आदेशाचे अनुषंगाने आज दि. १५/०२/२०२३ रोजी मा. श्री. मनोज लोहिया सह.पोलीस आयुक्त सो, मा. श्री. संजय शिंदे, अपर पोलीस आयुक्त सो, पिंपरी चिंचवड तसेच मा. श्री. काकासाहेब डोळे पोलीस उप-आयुक्त सो,वाहतूक शाखा व मा. श्री. सतिश माने सहा. पोलीस आयुक्त सो, वाहतूक शाखा, पिंपरी चिंचवड यांचे मार्गदर्शनाखाली सांगवी वाहतुक विभागात बीआरटी मधून येणा-या खाजगी वाहनांवर मोटार वाहन कायद्यान्वये रक्षक चौक व पिंपळे सौदागर बीआरटी लेन याठिकाणी खालीलप्रमाणे कारवाई करण्यात आलेली आहे.

१. बीआरटी मधून येणा-या **एकूण २०० खाजगी वाहनांवर केसेस** व दंड रुपये रक्कम **१,३९,०००/-** आकारण्यात आला आहे.
२. पीटीपी नाकाबंदी दरम्यान **एकूण ६४ वाहनांवर** अनपेड दंड असलेल्या वाहनचालकांकडून दंड रक्कम रुपये **४०,१००/- दंड** वसूल करण्यात आला आहे.

तसेच दि.०१/०२/२३ ते १४/०२/२०२३ रोजी पर्यंत विशेष मोहिम अंतर्गत खालील हेडखाली मोटार वाहन कायद्यान्वये जास्तीत जास्त केसेस करण्यात आलेल्या आहेत.

१)बीआरटी मधून येणा-या **एकूण ९५० खाजगी वाहनांवर केसेस** व दंड रुपये रक्कम **६,३६,०००/-** आकारण्यात आला आहे.

२) नो-एंट्री मधून येणा-या वाहनांवर एकूण **७७ केसेस** व दंड रुपये रक्कम **६,८,६००/-** आकारण्यात आला आहे.

३) काळी काच/ ब्लॅक फिल्म लावण्यात आलेल्या एकूण **१४० वाहनांवर केसेस दंड रक्कम रुपये १४९०००/-**आकारण्यात आला आहे.

४) पीटीपी नाकाबंदी दरम्यान **एकूण १९३१ वाहनांवर** अनपेड दंड असलेल्या वाहनचालकाकडून दंड रक्कम रुपये **१३,८७,७५०/- दंड** वसूल करण्यात आला आहे.

तरी सांगवी वाहतूक विभागातील अधिकारी व अमंलदार यांचेकडून वरीलप्रमाणे कारवाई करण्यात आलेली आहे तसेच यापुढेही भविष्यात दैनंदिनरित्या वाहतूक नियमांचे उल्लंघन करणा-या वाहनचालकांवर मोटार वाहन कायद्यान्वये जास्तीत जास्त कारवाई सुरु राहणार असून नागरिकांना वाहतूक नियमांचे पालन करणेबाबत आवाहन करण्यात आलेले आहे.

**(प्रसाद गोकुळे)**
वरिष्ठ पोलीस निरीक्षक
सांगवी वाहतूक विभाग